## नि. दि. दा. क्र. २०२/२०१९ मधील नि.१५ वरील आदेश

( सी.एन.आर. क्र. MHSN110008622019)

१. प्रस्तुतच्या अर्जान्वये प्रतिवादी नं.१ ते ५ यांनी त्यांच्याविरुध्द झालेला विना म्हणणे व एकतर्फा आदेश रद्दबातल करून त्यांची कैफियत कामी समाविष्ट करून घेणेबाबत विनंती केली आहे.

२. प्रतिवादी नं.१ ते ५ च्या अर्जामधील कथन असे की, प्रतिवादी नं.१ ते ५ यांना दि. ०१/०१/२०२० रोजी समन्स मिळाले होते. पैकी प्रतिवादी नं. ५ स्वतःहुन मे. कोर्टात ०४/०२/२०२० रोजी हजर राहीले. या कामी जमीन मिळकत बाबतची महत्वाची कागदपत्रे वेळेत उपलब्ध न झाल्यामुळे सदर केसच्या कामी मुदतीत कैफियत देता आली नाही. त्यामुळे मे. कोर्टसो यांनी सदर दाव्याच्या कामी प्रतिवादी नं. १ ते ४ यांचेविरुध्द एकतर्फा हुकूम होणेचा आहे तसेच प्रतिवादी नं. ५ विरुध्द विना म्हणणे चा आदेश होणेवर आहे.

३. सदर प्रतिवादी नं. १ ते ५ हे शेतकरी कुटुंबातील असुन यातील काही प्रतिवादी हे ड्रायव्हरचा व्यवसाय करतात ते परराज्यात ड्रायव्हींगला जात असल्याने व प्रतिवादी शेतकरी कुटुंबातील असल्याने मे. कोर्टात येवुन वकील नेमुण त्यांचे म्हणणे वेळेत मांडता आले नाही. प्रतिवादी नं. १ ते ५ यांनी मुद्दामहुन अथवा जाणूनबुजून सदर दाव्याच्या कामी कैफियत देण्यास टाळाटाळ केलेली नव्हती व नाही. सदरील प्रतिवादी नं. १ ते ५ यांना काही महत्वाची जुनी कागदपत्रे, नकाशा सिटी सर्व्हे ऑफिसकडुन वेळेत न मिळाल्यामुळे सदर कामी मुदतीत कैफियत देणे अडचणीचे झाले होते. सदर प्रतिवादी नं. १ ते ४ विरुध्द एकतर्फा हुकूमावर तारीख नेमली आहे तसेच प्रतिवादी नं. ५ विरुध्द झालेला विना म्हणणे चा आदेश रद्द होणे नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने महत्वाचे व गरजेचे आहे. तसेच दरम्यानचे काळात कोविड–१९ या आजाराचे प्रादुर्भावामुळे प्रतिवादी नं. १ ते ५ यांना मे. कोर्टात येऊन वकील

नेमणे अडचणीचे झाले होते. तसेच प्रतिवादी नं. १ ते ५ यांचा अर्ज मंजुर झालेस सदरचा दावा गुणदोषावर चालुन न्यायदान करणेस मे कोर्टसो यांना मदतच होणार आहे. याउलटसदरचा अर्ज मंजुर न झालेस सदर प्रतिवादी नं. १ ते ५ यांचे कधीही कशानेही भरुन न येणारे अपरिमित असे कायमचे नुकसान होणार आहे व सदरील प्रतिवादी नं. १ ते ५ यांना सदर मिळकतीत असणा–या न्यायहक्कास मुकावे लागणार आहे. तरी मे. कोर्टसो यांना प्रतिवादी नं. १ ते ४ विरुध्द एकतर्फा हुकूम तसेच प्रतिवादी नं. ५ विरुध्द विना म्हणणेचा हुकूम रद्दबातल होवुन प्रतिवादी नं. १ ते ५ यांची कैफियत दाखल करुन घेणेत यावी व तशी मे. कोर्टांनी परवानगी देववावी अशी विनंती केली आहे.

३. वादी यांनी नि. १५ खाली स्वतःचे म्हणणे दाखल करून अर्जास विरोध दर्शविलेला आहे. वादी यांना सदरचा अर्ज मान्य नाही कबूल नाही. विलंबाबाबत संयुक्तिक कारण नाही.सबब मे. कोर्टाने योग्य ते आदेश पारीत करावे हि विनंती केली.

४. वादी व प्रतिवादींच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

५. अर्ज वाचला. अर्जामधील कथने प्रतिवादींनी शपथेवर सांगितलेली आहेत. दाव्यातील रेकॉर्ड तपासले. प्रतिवादी नं. १ ते ५ यांना दि. ०१/०१/२०२० रोजीचे समन्स प्राप्त झाले होते. यातील काही प्रतिवादी हे ड्रायव्हरचा व्यवसाय करत असल्यामुळे ते परगावी असतात त्यामुळे त्यांना वेळेत हजर राहता आले नाही तसेच त्यानंतर कोव्हीड–१९ च्या महामारीसदृश्य परिस्थीतीमुळे कागदपत्रे काढून वकीलांना भेटून म्हणणे व कैफियत मांडता आले नाही. हे सदरचे प्रतिवादींचे म्हणणे त्यांनी शपथेवर नमूद केलेले आहे. त्यावरून प्रतिवादींच्या सांगण्यात सत्यता असल्याचे पटते व सदरचे कारण योग्य वाटते. दावा हा अतिक्रमित क्षेत्राचा कब्जा मिळणेकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर आलेस वादातील मूळ प्रश्नाची निर्णिती करण्यास न्यायालयास मदत होणार असून त्यामुळे वादीचे कसलेही नुकसान

होणार नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. प्रतिवादींचा अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. खर्चाबाबत कोणतेही आदेश नाहीत.

Sdxxxxxx

आटपाडी **(अनंत रा. टेंगसे )**

दि. ०६/०१/२०२२ सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आटपाडी.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file judgment/order are same, word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | A.A.Jamadar (L.G.) |
| Court. | : | Jt. Civil Judge, Jr.Dn., Atpadi. |
| Date. | : | 29.11.2021. |
| Judgment/order signed by the Presiding Officer on. | : | 29.11.2021. |
| Judgment uploaded on. | : | 29.11.2021. |